# पोलीस आयुक्तालय
## मिरा-भाईंदर,वसई -विरार
सेक्टर ०५, रामनगर शांती-गार्डन,मिरारोड (पुर्व) ठाणे ४०११०७
Email ID- dcphq.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

क्रमांक/वि.शा/टे-१३/मनाई आदेश/२०२२- १९८६. दिनांक :-१६/०३/२०२२

## फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (१) अन्वये मनाई आदेश

मिरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत परिमंडळ ०१ ते ०३ मध्ये दिनांक १७/०३/२०२२ होळी, दिनांक १८/०३/२०२२ धुलीवंदन/शब ए बरात, दिनांक २१/०३/२०२२ छत्रपती शिवाजी महाराज जयंती तिथीप्रमाणे, दिनांक २२/०३/२०२२ रंगपंचमी असे हिंदु/मुस्लीम बांधवांचे सण/उत्सव साजरे होणार आहेत.

ज्या अर्थी खात्रीशीररित्या असे समजले आहे की,मिरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील पोलीस ठाण्याच्या हद्दीत खालील नमुद घटना घडण्याची शक्यता आहे.

१. सार्वजनिक ठिकाणातील झाडे/लाकडे तोडणे, जाळणे, दहन करणे.
२. सदर सणाच्या निमित्ताने रस्त्यावरुन जाणाऱ्या दुचाकी, चारचाकी व इतर वाहनांना अडवुन त्यांचेकडुन पैशांची मागणी करणे.
३. रंगीत पाणी, रंग किंवा पादचाऱ्यावर पावडर फेकणे अथवा उडविण्याचा प्रयत्न करणे.
४. आरोग्यास अपायकारक होईल अशी रासायनिक रंगाचा वापर करणे.
५. रंगाचे फुगे, पाण्याचे फुगे अथवा इतर द्रव पदार्थाचे फुगे बनविणे अथवा प्लॅस्टिकच्या पिशव्यांचा वापर करुन फेकल्यामुळे आरोग्यास अपाय अथवा जिवास धोका निर्माण होईल असे कृत्य करणे.
६. सार्वजनिक जागेत अश्लिल शब्द उच्चारणे,घोषणा देणे,अश्लिल गाणी गाणे.
७. सार्वजनिक जागेत हावभाव करणे किंवा वाकुल्या व विटंबनाचे प्रदर्शन करणे/भरविणे किंवा चित्रे/चिन्हे/प्रतिकृती अथवा कोणतेही वस्तुंचे अथवा उद्देशांचे की, ज्यामुळे एखादयाची प्रतिष्ठा, योग्यता वा नैतिकतेला धक्का पोहचेल.

वरील नमुद प्रकार १ ते ७ अन्वये लोकांना कोणताही त्रास, अडथळा, दुखापत, जिवीतास धोका, आरोग्यास धोका अथवा सार्वजनिक शांततेस बाधा अथवा दंगा, मारामारी होवु नये व त्यास प्रतिबंध केला जावा म्हणुन,

त्या अर्थी मी विजयकांत सागर, पोलीस उप आयुक्त (मुख्यालय), पोलीस आयुक्तालयाकडील क्रमाकं/पो.आ.वा./अधि.प्रदान/आदेश/३०/२०२०, दिनांक- ०९/११/२०२० अन्वये, मा. पोलीस आयुक्त यांचे फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (१) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन मी वरील कृत्यांना (१ ते ७) मनाई करीत आहे.

सदर मनाई आदेश दिनांक १७/०३/२०२२ रोजीचे ००.०० वाजे पासुन ते दिनांक २२/०३/२०२२ रोजीचे २४.०० वाजे पर्यंत अंमलात राहील. वरील मनाई आदेशाचा भंग करणाऱ्या विरुध्द भारतीय दंड प्रक्रिया संहिता कलम १८८ प्रमाणे कारवाई करण्यात येईल.

दिनांक - /०३/२०२२

पोलीस उप आयुक्त (मुख्यालय) मिरा-भाईंदर, वसई-विरार आयुक्तालय

( विजयकांत सागर )
पोलीस उप आयुक्त(मुख्या.)
मि.भा.व.वि. पोलीस आयुक्तालय

प्रत:-

१. मा. अपर मुख्य सचिव,गृहविभाग (विशेष) महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांना सविनय सादर.

२. मा. पोलीस आयुक्त, मि.भा.व.वि. पोलीस आयुक्तालय यांना सविनय सादर.

३. मा. अपर पोलीस आयुक्त, मि.भा.व.वि. पोलीस आयुक्तालय यांना सविनय सादर.

४. मा. जिल्हाधिकारी तथा कार्यकारी दंडाधिकारी, ठाणे, पालघर यांना सविनय सादर.

५. मा. जिल्हा प्रसिध्दी अधिकारी, ठाणे,पालघर यांचेकडे वृत्तपत्रात बातमी म्हणुन प्रसिध्दीसाठी.

६. सर्व परिमंडळीय पोलीस उप आयुक्त,मि.भा.व.वि.

७. सर्व सहायक पोलीस आयुक्त, मि.भा.व.वि.

८. सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी, मि.भा.व.वि.

९. सरकारी मध्यवर्ती मुद्रणालय, चर्नी रोड, मुंबई यांना पुढील प्रसिध्दी होणा-या राजपत्रात प्रसिध्दीसाठी रवाना.

१०. नस्तीकरिता